# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | ईश्वराचे सत्ताशास्त्रीय गुण : पाश्चात्य तत्वज्ञांची भुमिका<br>**सुनील काळमेघ** | १-६ |
| २ | महाराष्ट्रातील ग्राम विकासात स्वयंसेवी संघटनांचे कार्य व योगदान<br>**डॉ. मोहम्मद अली एम. ए.** | ७-१३ |
| ३ | मथू सावंत: सशक्त ग्रामीण लेखिका<br>**प्रा. कांबळे डी. आर.** | १४-१७ |
| ४ | 'युनिव्हर्सिटी न्यूज' या नियतकालिकाचे आशय विश्लेषणात्मक अध्ययन<br>**श्री. संगीतराव साहेबराव टाले**<br>**प्रा. अरविंद एस. पाझारे** | १८-२८ |
| ५ | बालकामगार समस्या - समाजशास्त्रीय अभ्यास<br>**श्री. अय्युबखान समशेरखान पठाण** | २९-३२ |
| ६ | भारतातील दारिद्र्य व आर्थिक विषमता : एक चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. डॉ. चंद्रकांत वामनराव गजेवाड** | ३३-३७ |
| ७ | कोकणाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत सागरी मत्स्य व्यवसायाची भूमिका<br>**प्रा. एस. एल. सिताफुले** | ३८-४२ |
| ८ | मराठी साहित्य आणि अण्णा भाऊ साठे<br>**डॉ. लहू दिगंबर वाघमारे** | ४३-५० |
| ९ | आंबा प्रक्रिया उद्योग आणि निर्यात प्रोत्साहनातून आर्थिक विकास<br>**प्रा. डॉ. कृष्णा शंकर शहाणे** | ५१-५८ |

VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# ४. 'युनिव्हर्सिटी न्यूज' या नियतकालिकाचे आशय विश्लेषणात्मक अध्ययन

**श्री. संगीतराव साहेबराव टाले**
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.
**प्रा. अरविंद एस. पाझारे**
ग्रंथपाल, भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि. अमरावती.

**प्रस्तावना ( Introduction)**

'युनिव्हर्सिटी न्यूज' हे इंग्रजी नियतकालिक उच्च शिक्षणाशी संबंधित विविध विषयांवर माहिती देणारे एक साधन आहे. भारतीय विद्यापीठे संघटना (AIU) स्थापन झाल्यापासून भारतातील उच्च शिक्षणाशी संबंधित विविध उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी माहितीच्या देवाण घेवाणीसाठी उच्च शिक्षण, सांस्कृतिक, क्रीडा व संलग्न क्षेत्रातील सहकार्यात वाढ करण्यासाठी कार्य करीत आहे. विविध शैक्षणिक संस्थांमध्ये आणि शैक्षणिक विकासाबद्दल आस्था असणाऱ्यांमध्ये असणारी राष्ट्रीय पातळीवरील दुव्याची कमतरता भरुन काढण्यासाठी भारतीय विद्यापीठ संघटनेने 'युनिव्हर्सिटी न्यूज' या नियतकालिकाचे प्रकाशन सुरु केले.

या 'युनिव्हर्सिटी न्यूज' या नियतकालिका मध्ये उच्च शिक्षण क्षेत्रातील ताज्या व नविनतम माहितीचा समावेश असल्यामुळे त्याची माहिती वाचकांना होणार आहे. उच्च शिक्षणासंबंधी राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवरील विचार, महाविद्यालयीन परिसरातील घटना, विद्यापीठांनी स्वीकारलेले प्रबंध, विद्यापीठात उपलब्ध असणाऱ्या जागा, शैक्षणिक नोंदी, शैक्षणिक वृत्ते, सध्या सुरु असलेले संशोधन, महाविद्यालये, संशोधन क्षेत्रातील संस्था, प्रवेशाबद्दलच्या सूचना, महत्वाच्या कार्यक्रमाचे वेळापत्रक, पुस्तक परीक्षण इत्यादी घटकांची माहिती मिळते. या अभ्यासामुळे सदर घटकांची माहिती अभ्यासक, संशोधक, नोकरीची गरज असणारे, तरुण, विद्यार्थी यांना होणार असून या नियतकालिकाचे महत्व समजणार आहे. 'युनिव्हर्सिटी न्यूज' या नियतकालिकात उच्च शिक्षणाशी संबंधित विविध विषयांवर महत्वपूर्ण माहिती दिली असल्याने या अंकाचा अभ्यास हा महत्वाचा व उपयुक्त ठरणार आहे व नियतकालिकाचा वापर अधिक प्रमाणात केला जाऊ शकणार आहे.

**व्याख्या**

**बी. बेरेलसन :** " संज्ञापनातील व्यक्त किंवा प्रकट आशयाच्या वस्तुनिष्ठ व संख्यात्मक वर्णनाचे आशय विश्लेषण हे एक तंत्र आहे."

**पॉलिंग यंग :** " मुलाखत, प्रश्नावली, अनुसूची आणि इतर लिखीत किंवा मौखिक भाषाविषयक अभिव्यक्तीद्वारे प्राप्त संशोधन तथ्यांच्या आशयाचे वस्तुनिष्ठ आणि परिणामात्मक वर्णन करण्यासाठी उपयोगात आणले जाणारे संशोधनतंत्र म्हणजे आशय विश्लेषण होय. "

**उद्दीष्टये**

१. 'युनिव्हर्सिटी न्यूज' या नियतकालिकात विविध सदरांचा आढावा घेणे.

२. या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या विविध लेखांचा विषयवार आढावा.

३. या नियतकालिकातील पुरुष व महिला लेखकांचे योगदानाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा**

१. सदर संशोधनाची व्याप्ती 'युनिव्हर्सिटी न्यूज' या नियतकालिकापूरती मर्यादित आहे.

२. या नियतकालिकाच्या जानेवारी २०१७ ते डिसेंबर २०१७ या कालावधीतील सर्व ५१ अंकाचे आशय विश्लेषण करण्यात आले आहे.

**माहिती संकलनाची साधने**

माहिती संकलन हे संशोधनाकरीता निवडलेल्या ती 'युनिव्हर्सिटी न्यूज' या नियतकालिकेच्या सन २०१७ च्या जानेवारी ते डिसेंबर पर्यंतच्या अंकाचा वापर करुन माहिती संकलित करण्यात आली आहे. त्याशिवाय संशोधन प्रकल्प पूर्तीकरीता आवश्यक माहिती इतर संदर्भ साधने जसे पूर्वीचे प्रकल्प संबंधित विषयांवरील ग्रंथ व इतर वाचनसाहित्य व वेबसाइट व इंटरनेटच्या माध्यमातून जमा करुन तिचा वापर करण्यात आला आहे.

**युनिव्हर्सिटी न्यूज नियतकालिकाची माहिती**

'युनिव्हर्सिटी न्यूज' जानेवारी २०१७ ते डिसेंबर २०१७ मधील एकूण ५१ अंकाचे विश्लेषण करण्यात आले व खंड क्र. ५५ याचे पृथ्थकरण करण्यात आले. एक्सलशिटवर टाटा घेवून त्यांचे बार ग्रॉफ, पाय चार्ट तयार करण्यात आले.

'युनिव्हर्सिटी न्यूज' या नियतकालिकांमध्ये उच्च शिक्षण या विषयाशी संबंधित विविध पैलूंवर माहिती प्रसारीत केली जाते. त्याचबरोबर उच्च शिक्षणाशी संबंधित संशोधन, चर्चासत्रे, उच्च शिक्षणातील विविध वर्तमान घडामोडी, नोकरीविषयक जाहिराती,पुस्तके परीक्षण, अशा अनेक घटकांवर माहिती प्रसिध्द होत असल्याने उच्च शिक्षणासंबंधी संशोधन करणाऱ्या संशोधकांना, अभ्यासकांना, प्राध्यापक, विद्यार्थी व विद्वत्जन यांना उपयुक्त ठरणारे नियतकालिक आहे.

सदर संशोधनासाठी माहिती जमा करण्याकरीता खालील पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. संशोधनासाठी आशय विश्लेषण पध्दतीचा वापर करुन माहिती संकलित करण्यात आली आहे. त्यासाठी खालील पध्दतींचा वापर करण्यात आला आहे.

१. खंड क्र. ५५ च्या सर्व ५१ अंकातील सर्व संप्रेषणाची एका कार्ड स्लिपवर नोंदणी करण्यात आली.
२. प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र कार्ड स्लिप तयार करण्यात आली.
३. खंड क्र. ५५ च्या सर्व अंकांचे स्कॅनिंग (पृथ्थकरण) करण्यात आले आहे.
४. विविध प्रकारच्या संप्रेषणाचे विषयांची निवड करण्यात आली.
५. सर्व कार्ड स्लिपची मांडणी विभागवार केली गेली आणि त्याचे विश्लेषण करुन ते तक्त्यांच्या स्वरुपात मांडण्यात आले असून त्याचे सादरीकरण करण्यात आले आहे.
६. सादरीकण टेबल, चार्ट यांचा वापर करुन माहिती शास्त्रीय स्वरुपात मांडण्यात आली असून निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

'युनिव्हर्सिटी न्यूज' मध्ये नऊ प्रकारचे मुख्य घटक आहेत. हे सर्व घटक वेगवेगळे करुन त्याचे विश्लेषण केले त्याचा अन्वयार्थ (Interpretation) त्या खाली नमूद केले आहे.

**सारणी क्रमांक-१ साप्ताहिकाचे आशय घटक**


| अ.क्र. | विभाग |
|---|---|
| १ | लेख |
| २ | प्रोफाईल आणि बिल |
| ३ | पदवीप्रदान |
| ४ | इतर भाषणे |
| ५ | कॅम्पसमधील बातम्या |
| ६ | पुस्तक परीक्षण |
| ७ | संप्रेषण / संवाद |
| ८ | महिन्यातील प्रबंध / शोध निबंध |
| ९ | जाहिराती |

वरील सारणीत दर्शविलेले सर्व आशय घटक विभागानुसार मांडणी केले आहे. त्यापैकी काही नियमित तर काही अनियमित आशय घटक असल्याचे आढळून आले.

**सारणी क्रमांक २ : विभागवार विश्लेषण**

| अ.क्र. | विभाग | आशय घटक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | लेख | ३१० | ५.४३ |
| २ | प्रोफाईल आणि बिल | ०७ | ०.१२ |
| ३ | पदवी प्रदान | ५० | ०.८८ |
| ४ | इतर भाषणे | ०५ | ०.०९ |
| ५ | कॅम्पसमधील बातम्या | ३१४ | ५.५० |
| ६ | पुस्तक परिक्षण | ०६ | ०.१० |
| ७ | संप्रेषण | ०५ | ०.०९ |
| ८ | महिन्यातील प्रबंध | ४१२३ | ७२.१८ |
| ९ | जाहिराती | ८९२ | १५.६१ |
| | **एकूण** | **५७१२** | **१००** |

वरील सारणीवरुन असे दिसून आले की, सर्वात जास्त आशयघटक महिन्यातील प्रबंध या घटकाचा आहे. उदा. महिन्यातील प्रबंध ४१२३ (७२.१८%), त्यानंतर जाहिराती ८९२ (१५.६१%),कॅम्पसमधील बातम्या ३१४ (५.५०%), लेख ३१० (५.४३%), पदवी प्रदान ५० (०.८८%), प्रोफाईल आणि बिल ७ (०.१२%), इतर भाषणे (०.०९%), पुस्तक परिक्षण ६ (०.१०%), संप्रेषण ५ (०.०९%), असल्याचे आढळून आले.





### लेखांचे विषयावर विश्लेषण

एकूण ३१० लेखांमध्ये २२ विषयांचा समावेश आहे. खालील सारणीमध्ये लेखांचे विषयावर विश्लेषण सादर केलेले आहे.

**सारणी क्रमांक ३ : लेखांचे विषयवार विश्लेषण**

| अ.क्र. | विषय | लेखांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | परिक्षण व्यवस्था | ०३ | ०.९८ |
| २ | दर्जा व्यवस्थापन | ११ | ३.५५ |
| ३ | स्त्री सक्षमीकरण | ३३ | १०.६४ |
| ४ | शैक्षणिक क्षेत्र | ४८ | १५.४८ |
| ५ | उच्च शिक्षण | १०९ | ३५.१६ |
| ६ | ग्रंथालयशास्त्र | ०५ | १.६१ |
| ७ | वैद्यकशास्त्र | ०१ | ०.३२ |
| ८ | राज्यशास्त्र | ०२ | ०.६५ |
| ९ | माहिती तंत्रज्ञान | २२ | ७.१० |
| १० | विकासासाठी शिक्षण | १४ | ४.५२ |
| ११ | नितीशास्त्र | ११ | ३.५४ |
| १२ | पर्यावरण | ०१ | ०.३२ |
| १३ | योगा | ०३ | ०.९७ |
| १४ | अभियांत्रीकी | ०४ | १.२९ |
| १५ | शिक्षण व्यवस्थापन | १७ | ५.४८ |
| १६ | ज्ञान | ०१ | ०.३२ |
| १७ | जागतिकीकरण | ०४ | १.२९ |
| १८ | संशोधन | ११ | ३.५५ |
| १९ | वाणिज्य शिक्षण | ०३ | ०.९७ |
| २० | वृत्तपत्र व जनसंज्ञापण | ०१ | ०.३२ |
| २१ | साहित्य | ०३ | ०.९७ |
| २२ | सामाजिक शास्त्र | ०३ | ०.९७ |
| | **एकूण** | **३१०** | **१००.००** |

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, सर्वात जास्त चर्चिला गेलेला विषय उच्च शिक्षण १०९ (३५.१६%) हा आहे. त्यानंतर शैक्षणिक क्षेत्र ४८ (१५.४८%) स्त्री सक्षमीकरण ३३ (१०.६४%) व सर्वात कमी चर्चिला गेलेल्या विषयांमध्ये वैद्यकशास्त्र, पर्यावरण, ज्ञान व वृत्तपत्र व जनसंज्ञापण प्रत्येकी १ (०.३२%) यांचा समावेश होतो.





### लेखक प्रकार

या विभागामध्ये एक लेखक, दोन लेखक (एकत्रित ), दोनपेक्षा अधिक लेखक (सहलेखक ) आहेत.

**सारणी क्रमांक ४ : लेखक प्रकारचे विश्लेषण**

| अ.क्र. | लेखक प्रकार | लेखांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | एक लेखक | २१८ | ७०.३२ |
| २ | दोन लेखक | ७५ | २४.२० |
| ३ | दोनपेक्षा अधिक लेखक | १७ | ५.४८ |
| | **एकूण** | **३१०** | **१००.००** |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, सर्वात जास्त संख्या २१८ (७०.३१%) ही एका लेखकाने लिहिलेल्या लेखांची असून त्यानंतर दोन लेखकांनी लिहिलेल्या लेखांची संख्या ७५ (२४.२०%) व दोनपेक्षा अधिक लेखकांनी लिहिलेल्या लेखांची संख्या १७ (५.४८%) आढळून आली.





**सारणी क्रमांक ५ : लेखकांचे स्त्री / पुरुष विश्लेषण**

लेखकांमधील स्त्री किंवा पुरुषांचे प्रमाण शोधून काढण्यासाठी लिंग निहाय विश्लेषण करण्यात आले.

| अ.क्र. | लिंग | लेखांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पुरुष | २९० | ७०.३९ |
| २ | स्त्री | १२२ | २९.६१ |
| | **एकूण** | **४१२** | **१००.००** |

वरील सारणीवरुन असे समजून येते की, बहुसंख्य लेख हे पुरुष लेखकांनी २९० (७०.३९%) लिहिलेले असून स्त्री लेखकांची संख्या १२२ (२९.६१%) आहे.




**पदावरुन लेखकांचे विश्लेषण**


लेखकांचे पद शोधून काढण्यासाठी विश्लेषण करण्यात आले. या विभागातील लेखक हे विविध क्षेत्रांमध्ये उच्चशिक्षित आहेत. विविध पदांवरचे एकूण ४१२ लेखक आहेत.

**सारणी क्रमांक ६ : पदानुसार लेखकांचे विश्लेषण**

| अ.क्र. | पद | सहभागी असणाऱ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | ८७ | २१.१२ |
| २ | अधिष्ठाता | २९ | ७.०४ |
| ३ | अध्यक्ष | ११ | २.६७ |
| ४ | कुलसचिव | ०५ | १.२१ |
| ५ | प्राचार्य | २४ | ५.८२ |
| ६ | व्याख्याता | ०७ | १.७० |
| ७ | प्राध्यापक | ६२ | १५.०५ |
| ८ | सहयोगी प्राध्यापक | २८ | ६.७९ |
| ९ | सहप्राध्यापक | ७० | १७.०० |
| १० | अधिकारी | ०२ | ०.४९ |
| ११ | सचिव | ०१ | ०.२४ |
| १२ | संचालक | २२ | ५.३४ |
| १३ | सल्लागार | ०१ | ०.२४ |
| १४ | सहसल्लागार | ०३ | ०.७३ |
| १५ | विभाग प्रमुख | १३ | ३.१५ |
| १६ | ग्रंथपाल | १५ | ३.६४ |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | संशोधक विद्यार्थी | २२ | ५.३४ |
| १८ | नामांकित संस्थेचे सदस्य | ०७ | १.७० |
| १९ | समंत्रक | ०१ | ०.२४ |
| २० | संपादक | ०२ | ०.४९ |
| | **एकूण** | **४१२** | **१००.००** |

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, सर्वात जास्त योगदान हे कुलगुरु ८७ (२१.१२%), सहप्राध्यापक ७० (१७.००%), प्राध्यापक ६२ (१५.०५%), गंथपालांचे योगदान १५ (३.६४%) असून सर्वात कमी योगदान सचिव, सल्लागार व समंत्रक यांचे प्रत्येकी १ (०.२४%) एवढे आहे.





**पदवीदाने सोहळा भाषणे**

या विभागात ५० पदवीदान सोहळा भाषणे प्रसिध्द केलेली आहेत. त्याचे विश्लेषण व्यक्तींच्या पदाप्रमाणे केले आहे.

**सारणी क्रमांक ७ : पदवीदान सोहळा भाषणे विश्लेषण**

| अ.क्र. | पद | योगदानाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रपती | ०४ | ८.०० |
| २ | अध्यक्ष | ०५ | १०.०० |
| ३ | उपराष्ट्रपती | ०३ | ६.०० |
| ४ | कुलगुरु | ०५ | १०.०० |
| ५ | गव्हर्नर | ०५ | १०.०० |
| ६ | मंत्री | ०५ | १०.०० |
| ७ | चेअरमन | ०८ | १६.०० |
| ८ | व्यवस्थापकीय संचालक | ०५ | १०.०० |
| ९ | सचिव | ०४ | ८.०० |
| १० | न्यायाधिश | ०३ | ६.०० |
| ११ | प्राचार्य | ०१ | २.०० |
| १२ | उपमुख्यमंत्री | ०१ | २.०० |
| १३ | वकील | ०१ | २.०० |
| | **एकूण** | **५०** | **१००.००** |

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, सर्वात जास्त योगदान हे चेअरमन ८ (१६%) यांचे असून त्यानंतर अध्यक्ष, कुलगुरु, गव्हर्नर, मंत्री आणि व्यवस्थापकीय संचालक प्रत्येकी ५ (१०%) राष्ट्रपती, सचिव प्रत्येकी ४ (८%) न्यायाधिश व उपराष्ट्रपती प्रत्येकी ३(६%) तर सर्वात कमी योगदान प्राचार्य,उपमुख्यमंत्री व वकील १ (२%) यांचे आहे.





**बातमी विभाग :**या नियमित प्रकाशित होणाऱ्या विभागात भारतीय विद्यापीठाच्या बातम्या कॅम्पसमधील बातम्या व भारताबाहेरील बातम्या प्रसिध्द होतात.

**सारणी क्रमांक ८ : बातम्यांचे विश्लेषण**

| अ.क्र. | बातमी प्रकार | योगदानाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कॅम्पस बातम्या | २९९ | ९५.२२ |
| २ | भारतीय विद्यापीठ बातम्य | १३ | ४.१४ |
| ३ | भारता बाहेरील बातम्या | ०२ | ०.६४ |
| | **एकूण** | **३१४** | **१००.००** |

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, सर्वात जास्त बातम्या २९९ (९५.२२%) या कॅम्पसमधील असून त्यानंतर भारतीय विद्यापीठ बातम्या १३ (४.१४%) आणि त्यानंतर भारता बाहेरील बातम्या २ (०.६४%) प्रकाशित झालेले आढळून येते.





## कॅम्पस बातम्यांमधील आशय

कॅम्पसमध्ये विविध घटना या संपन्न होत असतात. त्यांची माहिती या सदराद्वारे पुरविली जाते. या प्रकारच्या बातम्यांमुळे विद्यापीठात कुठले कार्यक्रम चालू आहेत याची माहिती होते. याबरोबर विविध विद्यापीठातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरचे कार्यक्रमांची माहिती होते.

**सारणी क्रमांक ९ : कॅम्पसमधील बातम्यांचे विश्लेषण**

| अ.क्र. | कॅम्पसमधील बातम्यांचे विश्लेषण | योगदानाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | चर्चासत्रे | ७० | २३.४१ |
| | राज्यस्तरीय | ११ | |
| | राष्ट्रीय | ४८ | |
| | आंतरराष्ट्रीय | ११ | |
| २ | संशोधन कार्यक्रम | ०३ | १.०० |
| ३ | रिफ्रेशर कोर्स | ०९ | ३.०१ |
| ४ | स्पेशल लेक्चर | ०४ | १.३४ |
| ५ | कार्यशाळा | ४३ | १४.३८ |
| ६ | प्रशिक्षण कार्यक्रम | २८ | ९.३७ |
| ७ | परीषदा | १०५ | ३५.१२ |
| | राज्यस्तरीय | ०८ | |
| | राष्ट्रीय | ३५ | |
| | आंतरराष्ट्रीय | ६२ | |
| ८ | समारंभ | २५ | ८.३६ |
| ९ | स्पर्धा | ०५ | १.६७ |
| १० | पदवीदान सोहळा | ०३ | १.०० |
| ११ | बक्षीस | ०३ | १.०० |
| १२ | प्रवेश | ०१ | ०.३४ |
| | **एकूण** | **२९९** | **१००.००** |

वरील सारणीवरुन असे लक्षात येते की, सर्वात जास्त बातम्या १०५ (३५.१२%) परिषदांच्या असतात. त्यानंतर चर्चासत्रे ७० (२३.४१%), कार्यशाळा ४३ (१४.३८%), प्रशिक्षण कार्यक्रम २८ (९.३७%) आहे. समारंभ २५ (८.३६%), स्पर्धा ५ (१.६७%), स्पेशल लेक्चर ४ (१.३५%) संशोधन कार्यक्रम, बक्षीस व पदवीदान सोहळा प्रत्येकी ३ (१%) तसेसर्वात कमी बातम्या प्रवेश १ (०.३४%) आहेत.




**महिन्यातील प्रबंध**

विशिष्ट विषयात महिन्यात प्रकाशित होणाऱ्या अंकांतील प्रबंध शोधून काढण्यासाठी खालील विश्लेषण मांडण्यात आले.

**सारणी क्रमांक १० : विषयावर महिन्यातील अंकांप्रमाणे प्रबंध विश्लेषण**

| अ.क्र. | विषय | अंक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विज्ञान आणि तंत्रज्ञान | २५ | ४९.०२ |
| २ | सामाजिकशास्त्र | १३ | २५.४९ |
| ३ | मान्यव्यविद्या | १३ | २५.४९ |
| | **एकूण** | **५१** | **१००.००** |

वरील सारणीवरुन असे लक्षात येते की, विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयावरील एकूण २५ (४९.०२%) प्रबंध प्रकाशित झाले आहेत. त्यानंतर समाजशास्त्र व मानव्यविद्या या विषयावरील प्रत्येकी १३ (२५.४९%) प्रबंध प्रकाशित झालेले आहेत.




**निष्कर्ष**

१. विभागवार विश्लेषण केले असता सर्वात जास्त महिन्यातील प्रबंध ४१२३ एवढे दिसून आले.

२. युनिव्हर्सिटी न्यूजमधील लेखंमध्ये सर्वाधिक लेख हे उच्च शिक्षणावर असतात.

३. ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयाला स्थान नियतकालिकात देण्यात आले. ज्यामध्ये ०५ लेख प्रसिध्द झाले आहे.

४. दोनपेक्षा अधिक लेखकांच्या लेखांचे प्रमाण कमी म्हणजे १७ आढळून आले तर एका लेखकांनी लिहिलेल्या लेखांचे प्रमाण जास्त म्हणजे २१८ लेख दिसून आले.

५. स्त्री लेखकांपेक्षा पुरुष लेखकांचे प्रमाण नियतकालिकात जास्त दिसून येते.

६. लेख लिहिणाऱ्या लेखकांमध्ये कुलगुरु, सहप्राध्यापक, प्राध्यापकांचे प्रमाण जास्त आहे. ग्रंथपालाचे लेख १५ आहेत.

७. विविध मान्यवरांच्या पदवीदान सोहळया प्रसंगी दिलेला संदेश हा युनिव्हर्सिटी न्यूजचे महत्वाचे वैशिष्टय आहे.

८. पदवी समारंभ वृत्ताला नियतकालिकात अतिशय महत्वाचे स्थान देण्यात आले.

९. बातम्यांमध्ये उच्च शिक्षणाला अनुसरुन व अभ्यासकांसाठी उपयुक्त असे सेमिनार, कॉन्सफरंस, वर्कशॉबद्दल माहिती दिली जाते.

१०. व्याख्याते / संशोधक /शिक्षकेत्तर कर्मचारी यांना परिषदा, कार्यशाळा,'युनिव्हर्सिटी न्यूज' मुळे मदत होते.

११. नियतकालिकाचा खप सर्वदूर असल्याने त्यामधून देशातील व परदेशातील वाचकांना पसंत पडेल असे आशय मिळत असल्याचे दिसून येते.

१२. माहितीचे विस्तारीकरण करण्यासाठी नियतकालिक महत्वाची भूमिका पार पाडते.

**संदर्भ सूची**

१. अहिरे, अशोक आर, इंडियन जर्नल ऑफ इन्फरमेशन लायब्ररी अँड सोसायटी या नियतकालिकातील उल्लेखांचे विश्लेषण, ज्ञानगंगोत्री, (१ व २) जून- नोहेंबर २०१२, पृ. ३१.

२. आगलावे, प्रदिप. सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, नागपूर :श्री साईनाथ प्रकाशन,२००८,पृ. ३७६-३८३.

३. कुंभार, राजेंद्र. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र, पुर्ण : युनिव्हर्सल प्रकाशन २०१३ . पृ. १४८-१४९.

४. नरगुंदे, रेवती. प्रलेखन आणि माहितीशास्त्र , दुसरी आवृत्ती, पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन, २००० पृ. ११४

५. पवार, एल. पी. ग्रंथालय माहितीशास्त्र, कोल्हापुर : फडके प्रकाशन, २००३.

६. बाहेती, सत्यनारायण व डगवार, शामकांत, युनिव्हर्सिटी न्युज या नियतकालिकाचे आशय विश्लेषणात्मक अध्ययन, ज्ञानगंगोत्री मार्च - मे २००८ पृ.३६.

७. मेल्कॉम, विल्ली. वृत्तपत्र : आशय विश्लेषण, मॅग्रो हिल प्रकाशन, १९२६.

८. रिसवडकर, म.रा. आशय विश्लेषण ज्ञानगंगोत्री, मार्च - एप्रिल- मे २००१ पृ.६.

9. Alonso, M.I. New Approches to content analysis from modem Linguistics, 6(1), Jan2000.

10. Berelson, Bemared. Content Analysis in communication research, New York : Free Press, 1952, p.92-98.

11. Budd Richard. Content Analysis of communication research, New York : Free Press, p.2-18

Peer Reviewed Referred and UGC
Listed Journal (Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
N INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X, Issue - I,
January - March - 2021

English / Marathi / Hindi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399 www.sjifactor.com




Ajanta Prakashan